मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी महापालिकेची 'पट वाढवा' मोहीम

## विशेष प्रवेश मोहिमेचा शुभारंभ आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिखलीतील म्हेत्रेवाडी शाळा क्रमांक ९३ येथे गुढीपाडव्याच्या निमित्ताने 'गुढीपाडवा - पट वाढवा' या विशेष प्रवेश मोहिमेचा शुभारंभ आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आला. शाळेत नव्याने प्रवेश घेऊन आपल्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आयुक्तांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, नगरसेवक यश साने, नगरसेविका प्रियांका कुदळे, रिटा सानप, शिक्षण विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापिका स्नेहल मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी या वेळी उपस्थित होते.



"गुढीपाडवा - पट वाढवा' ही मोहीम केवळ प्रवेश वाढविण्यापुरती मर्यादित नसून, प्रत्येक मुलापर्यंत दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण पोहोचविण्याचा हा व्यापक प्रयत्न आहे. महापालिका शाळांमधील आधुनिक सुविधा, समर्पित शिक्षकवर्ग आणि विद्यार्थीकेंद्री उपक्रम यांच्या बळावर शिक्षणाची भक्कम पायाभरणी होत आहे. त्यामुळे अधिकाधिक पालकांनी या गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर विश्वास ठेवून आपल्या पाल्यांना महापालिका शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, तसेच या शैक्षणिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा,' असे आवाहन डॉ. सूर्यवंशी यांनी केले.

महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खासगी शाळांच्या तोडीस तोड अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक साधनसामग्री आणि विद्यार्थीकेंद्री उपक्रमांमुळे पालकांचा महापालिका शाळांवरील विश्वास दृढ होत आहे, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांनी सांगितले.

### प्रवेश मोहिमेची सुरुवात

**» चिखलीतील म्हेत्रेवाडी शाळा क्रमांक ९३ येथे 'गुढीपाडवा – पट वाढवा' या विशेष प्रवेश मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश अधिकाधिक विद्यार्थ्यांना महापालिका शाळांकडे आकर्षित करणे आणि शिक्षणाचा प्रसार वाढवणे हा आहे. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरू झालेल्या या मोहिमेला पालकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.**

### गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर

**» महापालिका शाळांमध्ये आधुनिक सुविधा, प्रशिक्षित शिक्षक आणि विद्यार्थीकेंद्री उपक्रमांमुळे शिक्षणाचा दर्जा उंचावला आहे. खासगी शाळांच्या तोडीस तोड सुविधा उपलब्ध करून दिल्याने पालकांचा विश्वास वाढत आहे. या मोहिमेद्वारे प्रत्येक मुलापर्यंत दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रशासनाने पालकांना या शैक्षणिक चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.**

# राजस्थानमधील अपघातग्रस्तांना सर्वतोपरी मदत; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

## फिरायला गेलेल्या तरुणांच्या कारचा कोटा येथे अपघात; नातेवाईक घटनास्थळी दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

फिरण्यासाठी गेलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील तरुणांच्या एका मोटारीला राजस्थानमधील कोटा शहरात अपघात झाला असून त्यात तिघांचा मृत्यू झाला आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या मतदारसंघात ही घटना घडली आहे. त्यांच्या सचिवाशी माझी चर्चा झाली आहे. तिघांच्या मृतदेहाचे पोस्ट मार्टम झाले असून नातेवाईक तिथे पोहोचले आहेत. गुरुवारी सकाळी मृतदेह शहरात आणण्यात येणार आहेत, अशी माहिती खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.





पिंपरी-चिंचवड शहरातील 14 तरुणांचा ग्रुप मोटारीने फिरण्यासाठी परराज्यात गेला आहे. या तरुणांच्या एका मोटारीचा राजस्थानमधील कोटा शहरात बुधवारी पहाटे अपघात झाला. त्यात तिघांचा झोपतेच मृत्यू झाला आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या सचिवाने मला संपर्क साधून या अपघाताची माहिती दिली. माझी त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. संपूर्ण मदत करण्यात आली आहे. तिघांच्या मृतदेहाचे पोस्ट मार्टम झाले असून नातेवाईक तिथे पोहोचले आहेत. मृतदेह आणण्यासाठी इअर ॲम्बुलन्स उपलब्ध झाली आहे. पण, 300 किलोमीटरचे अंतर आहे. त्यामुळे मृतदेह विमानाने की ॲम्बुलन्सने आणायचे याबाबत कुटुंबातील सदस्यांशी चर्चा सुरू आहे, असे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. लेह-लडाखच्यामध्ये कारगिल येथे हे पर्यटक आठ दिवसांपूर्वी अडकले होते. बर्फवृष्टी झाल्याने रस्ते बंद होते. त्यामुळे पाच दिवस ते एकाच ठिकाणी अडकले होते. त्यांना कोठेही जाता येत नव्हते. त्यावेळीही त्यांचा फोन आला होता. बीएसएफच्या कमांडरशी संवाद साधून या पर्यटकांना तेथून सोडले होते,

### लेहमध्ये अडकले होते

**» लेह-लडाखच्यामध्ये कारगिल येथे हे पर्यटक आठ दिवसांपूर्वी अडकले होते. बर्फवृष्टी झाल्याने रस्ते बंद होते. त्यामुळे पाच दिवस ते एकाच ठिकाणी अडकले होते. त्यांना कोठेही जाता येत नव्हते. त्यावेळीही त्यांचा फोन आला होता. बीएसएफच्या कमांडरशी संवाद साधून या पर्यटकांना तेथून सोडले होते, असेही खासदार बारणे यांनी सांगितले.**

# पिंपरीत बांधकामांमुळे पदपथ व सायकल ट्रॅक उद्ध्वस्त; नागरिक संतप्त

## अवजड वाहनांमुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान; तातडीने कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, पिंपळे गुरव, नवीन सांगवी, जुनी सांगवी, परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या बांधकामांमुळे पादचारी मार्ग अक्षरशः उद्ध्वस्त होत असल्याचे दिसत आहे. संबंधित बांधकामांना अधिकृत परवानग्या असल्या तरी कामाच्या पद्धतीवर कोणतेही नियंत्रण नसल्याने सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अवजड वाहनांमुळे पदपथ, सायकल ट्रॅक आणि रस्त्यालगतची संरचना पूर्णपणे दबली जात असून, नागरिकांना चालणेही कठीण झाले आहे

आधीच अतिक्रमणामुळे अडथळलेले पदपथ पूर्णपणे निकामी होत आहेत. या वाहनांच्या वजनामुळे ड्रेनेजची झाकणे खचत आहेत. तर, लोखंडी रेलिंग तुटत आहेत आणि रस्त्यालगतची झाडेही मोडून पडत आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत उभारण्यात आलेले सायकल ट्रॅक सुद्धा या निष्काळजीपणामुळे खराब होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.



### वाहनांमुळे ड्रेनेजचे झाकणे तुटली

» बांधकामाच्या ठिकाणी क्रेशर, मिक्सर,आरएमसी ट्रक आणि डंपर ही अवजड वाहने थेट पादचारी मार्गावर चढवली जात आहेत. परिणामी, आधीच अतिक्रमणामुळे अडथळलेले पदपथ पूर्णपणे निकामी होत आहेत. या वाहनांच्या वजनामुळे ड्रेनेजची झाकणे खचत आहेत. तर, लोखंडी रेलिंग तुटत आहेत आणि रस्त्यालगतची झाडेही मोडून पडत आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत उभारण्यात आलेले सायकल ट्रॅक सुद्धा या निष्काळजीपणामुळे खराब होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना बसत आहे. पादचारी मार्ग वापरण्यायोग्य नसल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागत आहे. दिवसरात्र सुरू असलेल्या या बांधकामांमुळे ध्वनी व धुळीचे प्रदूषणही वाढले असून, परिसरातील रहिवाशांचा संताप उफाळून येत आहे. परवानगी आहे म्हणून मनमानी चालणार का? असा सवाल नागरिक प्रशासनाला करत आहेत

या नुकसानाची जबाबदारी नेमकी कोण घेणार? बांधकाम व्यावसायिक, ठेकेदार की संबंधित प्रशासन? सार्वजनिक मालमत्तेची हानी होत असताना याकडे दुर्लक्ष का केले जाते, असा रोष व्यक्त होत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून दोषींवर दंडात्मक कारवाई करावी आणि नुकसान भरपाई वसूल करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

### प्रदुषणात वाढ

» या सगळ्याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना बसत आहे. पादचारी मार्ग वापरण्यायोग्य नसल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागत आहे. दिवसरात्र सुरू असलेल्या या बांधकामांमुळे ध्वनी व धुळीचे प्रदूषणही वाढले असून, परिसरातील रहिवाशांचा संताप उफाळून येत आहे. परवानगी आहे म्हणून मनमानी चालणार का? असा सवाल नागरिक प्रशासनाला करत आहेत.

### संबंधितांवर कारवाईची मागणी

» सर्वात मोठा प्रश्न म्हणजे, या नुकसानाची जबाबदारी नेमकी कोण घेणार? बांधकाम व्यावसायिक, ठेकेदार की संबंधित प्रशासन? सार्वजनिक मालमत्तेची हानी होत असताना याकडे दुर्लक्ष का केले जाते, असा रोष व्यक्त होत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून दोषींवर दंडात्मक कारवाई करावी आणि नुकसान भरपाई वसूल करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

> आम्ही लगेच विभागीय आरोग्य रक्षकांना त्या ठिकाणी पाहणी करण्यास सांगू. राडारोडा आढळल्यास तो त्वरित उचलण्याच्या सूचना दिल्या जातील व गरज भासल्यास दंडात्मक कारवाईही करण्यात येईल.
>
> - शांताराम माने, आरोग्य विभागीय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय

# तापमान वाढीवर प्रभावी उपाययोजनांकडे महापालिकेचे दुर्लक्ष

## राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मार्गदर्शक सूचना, प्रभावी उपाययोजना करण्याचे आदेश महापालिकेला दिले होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक तापमान वाढीने निर्माण होणाऱ्या समस्या आणि उष्णतेच्या लाटांमुळे आरोग्य विषयी गंभीर समस्या निर्माण होत आहे. यावर नागरिकांचा बचाव करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मार्गदर्शक सूचना, प्रभावी उपाययोजना करण्याचे आदेश महापालिकेला दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या वतीने हिट ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला आहे. परंतु, उष्णतेच्या लाटांपासून नागरिकांचा बचाव करण्यासाठी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा विसर महापालिकेला पडला असल्याचे दिसून येत आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेने केलेल्या पाहणीत वाकड, रावेत, मोशी, चिखली, दिघी, रावेत यासह अन्य भागात प्रचंड उष्णतेचा प्रभाव दिसून येत आहे. उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्युंचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. दरवर्षी जागतिक तापमानात वाढ होत असून दैनंदिन कामकाज करताना अनेक लोकांच्या जीवनावर परिणाम होत आहे. तापमान बदल व वाढत्या उष्णतेबाबत पुरेशी काळजी आणि उपाययोजना केल्या नाही तर उद्भवणाऱ्या समस्यांचा प्रत्येक घटकाला सामना करावा लागणार आहे.

शहरात उष्णतेच्या लाटांमुळे आरोग्य विषयी गंभीर समस्या निर्माण होवू लागल्या आहेत. उन्हाळ्यामुळे उद्भवणाऱ्या समस्यांमध्ये प्रामुख्याने अतिसारासारखे पचनक्रियेशी संबंधित आजार आणि उष्माघात या आजारांचा समावेश आहे. याशिवाय त्वचा संदर्भात समस्या देखील उद्भवत आहेत. वातावरणातील कमाल तापमानात चार ते पाच अंशापेक्षा अधिक वाढ झाली असेल, तर उष्णतेची लाट येण्याची शक्यता असते.

दरम्यान, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास सर्वसामावेश मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी जिल्हा व महापालिका स्तरावर प्रभावी उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले होते. त्या मार्गदर्शक सूचनांचा महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागास विसर पडला आहे. त्यामुळे उष्णतेच्या बचाव करण्यासाठी नागरिकांची ससेहोलपट होवू लागली आहे.

### वैद्यकीय विभागाचे नागरिकांना आवाहन

» उन्हाळ्याच्या झळा आता तीव्र झाल्या आहेत. यावर्षी उष्णतेची लाट नेहमीपेक्षा लवकर येण्याचा व दीर्घकाळापर्यंत राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. उष्माघातापासून बचावासाठी मार्गदर्शक सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत.

# महापालिका उभारणार 3 नवे 'डॉग शेल्टर'; 25 कोटींची तरतूद

## सारसबागेसह शहराच्या विविध भागांतील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची नगरसेवकांची मागणी.

**पुणे | प्रतिनिधी**

भटक्या आणि मोकाट कुत्र्यांचा उपद्रव थांबवा, योग्य ती कार्यवाही करावी, अशा मागण्या नगरसेवकांनी बुधवारी महापालिका मुख्य सभेत केल्या. या प्रश्नावर ठोस उपाययोजना करू, असे आश्वासन महापालिका प्रशासनाने दिले आहे. नगरसेविका ऐश्वर्या पठारे, नगरसेवक कुणाल टिळक, धीरज घाटे, प्रिया गदादे, अर्चना पाटील, सभागृह नेते गणेश बिडकर आदींनी भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर असल्याबाबत प्रशासनाचे लक्ष वेधले.

मुख्य सभेत आयत्या वेळच्या विषयावर झालेल्या या प्रश्नावरील चर्चेत अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी प्रशासन करत असलेली कार्यवाही आणि उपाययोजनांची माहिती देऊन ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनीही हा प्रश्न गंभीर असल्याने तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले.




### नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न

» शहरात भटक्या आणि मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढत असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. चाकण येथील हल्ल्याचा संदर्भ देत नगरसेवकांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. लसीकरण आणि नसबंदी मोहिमा अपेक्षित वेगाने होत नसल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांची वाढती संख्या नागरिकांमध्ये भीती निर्माण करत आहे.

भटक्या आणि मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यांबाबत नगरसेवकांनी चाकण येथील घटनेत कुत्र्यांच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाल्याच्या घटनेचा संदर्भ दिला. कुत्र्यांचा बंदोबस्त केला का करत नाही, लसीकरण आणि नसबंदी करण्याची क्षमता असूनही, त्या वेगाने का होत नाहीत, असे मुद्दे मांडले.

घाटे यांनी सारसबागेत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाल्याचे निवेदन प्रशासनाला दिले होते. त्यावर प्रशासनाने कारवाई केली; परंतु या कुत्र्यांना खाद्य देणाऱ्यांवर नियंत्रण आणणे, फिडींग पॉइंट ठरवणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

मोकाट कुत्र्यांविरोधात तक्रार करणाऱ्यांच्या विरोधात प्राणिमित्र नागरिक केंद्रीय संस्थेकडे तक्रार करतात, हे प्रकार थांबणे गरजेचे आहे, असे सदस्यांनी नमूद केले. समाविष्ट गावांत संकरीत मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगून ती अधिक हिंस्र असतात असतात, मांसाहार मिळाला नाही, तर ते मानवावर हल्ला करतात, ही गंभीर बाब बिडकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

फीडिंग पॉइंट्स निश्चित करणे, कुत्र्यांवर नियंत्रण ठेवणे आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे यावर भर देण्यात येणार आहे. तसेच, नागरिक आणि प्राणिमित्र यांच्यात समन्वय साधून शाश्वत उपाय शोधण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. प्रशासनाने लवकरच प्रभावी पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत.

### उपाययोजनांवर भर

» महापालिका प्रशासनाने या समस्येवर ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. फीडिंग पॉइंट्स निश्चित करणे, कुत्र्यांवर नियंत्रण ठेवणे आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे यावर भर देण्यात येणार आहे. तसेच, नागरिक आणि प्राणिमित्र यांच्यात समन्वय साधून शाश्वत उपाय शोधण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. प्रशासनाने लवकरच प्रभावी पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत.

> "महापालिकेतर्फे शहराच्या तीन भागांत डॉग शेल्टर उभारण्यात येणार असून, त्यासाठी अंदाजपत्रकात २५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. प्रत्येक शेल्टरमध्ये एक हजार कुत्री ठेवता येतील, एवढी क्षमता असून, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही केली जात आहे."
> - पवनीत कौर, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका

---

# पहलगाम हल्ल्यानंतर जगदाळे कुटुंबाला न्याय; आसावरी जगदाळे यांची महापालिकेत नियुक्ती

## महापौर मंजुषा नागपूरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान; पुणे महापालिकेत वर्ग-2 पदावर नियुक्ती

**पुणे | प्रतिनिधी**

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात पुण्यातील संतोष जगदाळे यांचा मृत्यू झाल्यानंतर वर्षभर न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या त्यांच्या कुटुंबाला अखेर दिलासा मिळाला आहे. संतोष जगदाळे यांची कन्या आसावरी जगदाळे यांना पुणे महानगरपालिका येथे वर्ग-२ (प्रशासकीय अधिकारी) पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

महापौर मंजुषा नागपूरे यांच्या हस्ते, सभागृह नेते गणेश बिडकर आणि आयुक्त नवलकिशोर राम यांच्या उपस्थितीत आसावरी यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीद्वारे त्यांचे अभिनंदन केले.



आसावरी जगदाळे यांनी संगणक शास्त्रात पदवी तसेच मानव संसाधन व्यवस्थापनात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करून त्यांना समकक्ष पद उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. सामान्यतः महापालिका स्तरावर वर्ग-३ किंवा वर्ग-४ पदे भरण्याचे अधिकार असतात; मात्र राज्य शासनाने 'विशेष बाब' म्हणून आसावरी यांच्यासाठी वर्ग-२ (प्रशासकीय अधिकारी) पदाला मंजुरी दिली आहे. काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात पुण्यातील संतोष जगदाळे यांचा मृत्यू झाल्यानंतर वर्षभर न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या त्यांच्या कुटुंबाला अखेर दिलासा मिळाला आहे.

पहलगाम दुर्घटनेनंतर जगदाळे कुटुंबाच्या सांत्वनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. त्या वेळी कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाच्या पार्श्वभूमीवर आसावरी यांना शासकीय नोकरी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. प्रशासकीय प्रक्रियेमुळे काही विलंब झाला असला, तरी शिंदे यांनी महापालिका प्रशासनाशी थेट संवाद साधून प्रक्रिया गतिमान करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

### 'विशेष बाब' म्हणून वर्ग-२ पद

» आसावरी जगदाळे यांनी संगणक शास्त्रात पदवी तसेच मानव संसाधन व्यवस्थापनात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करून त्यांना समकक्ष पद उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. सामान्यतः महापालिका स्तरावर वर्ग-३ किंवा वर्ग-४ पदे भरण्याचे अधिकार असतात; मात्र राज्य शासनाने 'विशेष बाब' म्हणून आसावरी यांच्यासाठी वर्ग-२ (प्रशासकीय अधिकारी) पदाला मंजुरी दिली आहे.

# पुण्यात बाहेर खाणे आता महाग! हॉटेलचालकांचा मोठा निर्णय

## इंधनाचा खर्च वाढल्याने हॉटेलचालकांनी खाद्यपदार्थांच्या किमतीत सुमारे 10 टक्के वाढ केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील हॉटेलांचा द्रवरूप पेट्रोलियम वायू (एलपीजी) सिलिंडर पुरवठा दोन आठवड्यांपासून बंद असून, त्याची झळ आता ग्राहकांच्या खिशाला बसू लागली आहे. हॉटेलचालकांकडून एलपीजी सिलिंडरला इतर इंधन पर्यायांचा वापर सुरू असून, त्याचा भार ग्राहकांवर टाकण्यात आला आहे. त्यातच खाद्यतेलासह इतर वस्तूंच्या किमती महागल्याचा परिणामही झाला आहे. यामुळे हॉटेलचालकांनी खाद्यपदार्थांच्या किमतीत सुमारे १० टक्के वाढ केली आहे.

पश्चिम आशियातील युद्ध सुरू झाल्यापासून व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठा बंद आहे. हॉटेलांना मिळणारा हा सिलिंडर ६ मार्चपासून बंद झाला. तेव्हापासून हॉटेल व्यवसायावर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक हॉटेलचालकांनी कोळसा आणि विजेच्या शेगड्यांचा वापर सुरू केला आहे. मात्र, या शेगड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्या महागड्या किमतीत खरेदी कराव्या लागल्या आहेत. सध्या या शेगड्याही बाजारात उपलब्ध नाहीत. याचवेळी व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलिंडरचा काळाबाजार सुरू असून, तो अडीच ते तीनपट किमतीने उपलब्ध होत आहे. हा इंधनाचा खर्च वाढल्याने हॉटेलचालकांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

खाद्यतेलाच्या किमतीचाही भडका उडाला असून, किमतीत २० टक्के वाढ झाली आहे. याचबरोबर शेंगदाणा आणि डाळींच्या किमतीतही वाढ झाली आहे. यामुळे हॉटेलचालकांच्या खर्चात वाढ झाली आहे. आधीच इंधनाच्या वाढलेल्या खर्चात या वस्तूंच्या महागाईची भर पडली आहे. यामुळे शहरातील हॉटेलचालकांनी खाद्यपदार्थांच्या किमतीत सुमारे १० टक्के वाढ केली आहे. काही ठिकाणी ही वाढ ३० टक्क्यांपर्यंत आहे. यामुळे ग्राहकांच्या खिशाला आता याची झळ बसू लागली आहे. सध्या पुण्यातील १० टक्के हॉटेल बंद झाली आहे. अनेक हॉटेल इंधनाच्या उपलब्धतेनुसार व्यवसाय सुरू ठेवत आहेत. इंधन मिळाल्यास हॉटेलांकडून व्यवसाय सुरू ठेवण्यात येत असून, ते संपल्यानंतर व्यवसाय बंद करण्यात येत आहे. यामुळे आगामी काळात खाद्यपदार्थांच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता हॉटेलचालक व्यक्त करीत आहेत.




### कोळसा, लाकडासाठी प्रतीक्षा

» एलपीजी सिलिंडर नसल्याने हॉटेलचालक कोळसा आणि लाकडाचा वापर करीत आहेत. मात्र, मागणी वाढल्याने कोळसा आणि लाकूड उपलब्ध होत नसल्याचे चित्र आहे. त्यासाठीही प्रतीक्षा करावी लागत आहे. शहरातील मॉलमधील हॉटेल आणि मोठ्या रेस्टॉरंटमध्ये पाईप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) जोडणी असून, उरलेली ९० टक्क्यांहून अधिक हॉटेल एलपीजी सिलिंडरवर अवलंबून आहेत. जिल्हा प्रशासनाकडे एलपीजी पुरवठा करण्याची विनंती करीत आहोत, असे नॅशनल रेस्टॉरन्ट असोसिएशन ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षा सायली जहागीरदार यांनी सांगितले.

### कामगार निघून जाण्याचा धोका

» शहरातील हॉटेल व्यवसायात सुमारे दीड लाख कामगार आहेत. यातील ७० टक्के कामगार हे परप्रांतीय आहेत. व्यवसाय बंद झाल्यास या कामगारांची उपासमार होणार आहे. त्यामुळे उपासमार टाळण्यासाठी हे कामगार त्यांच्या मूळ राज्यात परत जातील. पुढील महिन्यात काही राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. यामुळे एकदा गेलेला कामगार लवकर परतणार नाही. यातून आगामी काळात कामगार टंचाईची भीषण समस्या हॉटेल क्षेत्रासमोर उभी राहील, अशी माहिती पुणे रेस्टॉरन्ट अँड केटरिंग असोसिएशनचे अध्यक्ष किशोर सरपोतदार यांनी दिली.

> जिल्हा प्रशासनाकडून एलपीजी सिलिंडर वितरणावर देखरेख ठेवण्यात येत आहे. सिलिंडरचा काळाबाजार आढळल्यास कारवाई करण्यात येत आहे. जिह्यातील सिलिंडरचा साठा आणि वितरण यांची आकडेवारी गॅस कंपन्यांकडून दररोज घेण्यात येत आहे. व्यावसायिक वापराच्या सिलिंडरचा पुरवठा सुरू करण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.
>
> **- महेश सुधळकर, जिल्हा पुरवठा अधिकारी**

# जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी वीरधवल जगदाळे बिनविरोध उपाध्यक्षपदी विवेक वळसे पाटील

## पुणे जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचा यशवंतराव चव्हाण सभागृहात सत्कार करण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे वीरधवल जगदाळे यांची, तर उपाध्यक्षपदी विवेक वळसे-पाटील यांची बुधवारी बिनविरोध निवड झाली. अध्यक्षपदासाठी शिवसेनेचे (ठाकरे) उमेदवार विजयसिंह शिंदे आणि उपाध्यक्षपदासाठी शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार मंगेश काकडे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर पीठासीन अधिकारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जगदाळे आणि वळसे पाटील यांच्या विजयाची घोषणा केली.

अध्यक्ष आणि उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे (अजित पवार) कायम राहिले असून, जगदाळे आणि वळसे पाटील यांच्या निवडीमुळे दौंड आणि आंबेगाव तालुक्याकडे ही पदे आली आहेत. चार वर्षांनंतर जिल्हा परिषदेला अध्यक्ष आणि उपाध्यक्षपद मिळाले असून ,येत्या काही दिवसांमध्ये विषय समितीच्या सभापती आणि उपसभापतींची निवड होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीची विशेष सभा झाली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या समन्वयक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमुख-मोहिते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकात वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात, भूषण जोशी, जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य, पंचायत समितीचे सभापती या वेळी उपस्थित होते.

त्यांच्या विरोधात अनुक्रमे विजयसिंह शिंदे आणि मंगेश काकडे यांनी अर्ज दाखल केला होता. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसला स्पष्ट बहुमत असल्याच्या पार्श्वभूमीवर हे दोन्ही अर्ज मागे घेण्यात आले. त्यामुळे जगदाळे आणि वळसे पाटील यांची बिनविरोध निवड झाली.



### वीरधवल जगदाळे दोन वेळा उपाध्यक्ष

» वीरधवल जगदाळे हे जिल्हा परिषदेचे दोन वेळा उपाध्यक्ष होते. गेल्या विधानसभा निवडणुकीतही त्यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनंतर त्यांनी तो मागे घेतला होता. जिल्हा परिषद निवडणुकीत खडकी-देऊळगाव राजे या गटातून ते निवडून आले होते. भाजप उमेदवाराचा पराभव केल्यानंतर ते तिसऱ्यांदा जिल्हा परिषदेवर निवडून आले. विवेक वळसे पाटील हे आंबेगाव तालुक्यातील असून त्यांना दुसऱ्यांदा उपाध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. विवेक यांचे आजोबा, माजी आमदार दत्तात्रय वळसे पाटील यांनीही जिल्हा परिषदेचे अर्थ आणि बांधकाम सभापती म्हणून काम पाहिले आहे.